# लडाख (भाग १०) - बारमाही लडाख

अनेक अतर्क्य, अशक्य वाटणाऱ्या कितीतरी गोष्टी आत्माराम परब या माणसाने केल्या आहेत असं मी मागच्या पोस्ट म्हटलं होतं ते याचसाठी कारण ईशा टुर्सने लडाख बारमाही करून टाकलं आहे. मे ते ऑक्टोबर लडाखला सहली तर नेल्याच पण नंतर नोव्हेबर ते फेब्रुवारी आणि एप्रिल अशा सहली नेऊन बहार आणली आहे.



विंटर लडाखच्या सहली लोकप्रिय करून आणि सोबत चादर ट्रेकचा आनंद देऊन शेकडो पर्यटक लडाखला आणले. २०१८ च्या जानेवारीत अशाच एका सहलीचं नेतृत्व मी केलं होतं. गोठलेल्या नदीच्या प्रवाहावर चालणं आणि वजा ३५ तपमानात तंबूमध्ये रात्री काढणं असा अनुभव व एक आगळीच शक्ती ही सफर देऊन गेली. चादर ट्रेक बरोबरच पोलो ग्राउंडवर झालेला प्रजासत्ताक दिनाचा सोहळा मी कधीही विसरू शकणार नाही. वजा २५ तपमानात हजारो लडाखी झेंडावंदनाला आले होते. कडाक्याच्या थंडीत लेह फुलून गेलं होतं.

गेल्याच वर्षीच्या डिसेंबरमध्ये आम्ही मोजकेच मित्र लडाखला गेलो होतो. महामारीच्या सर्व समस्यांवर उत्तर शोधून आत्माने आम्हाला आग्रहाने तिथं नेलं होतं. तीही लडाखची एक हिवाळी सफर होती. कुठलीच बंधनं नसल्याने आम्ही मनसोक्त लडाख फिरलो. गोठलेल्या प्रवाहावर लोळण घेतली. वाट फुटेल तिकडे गेलो, जिवाचं लडाख केलं.



जपानचा चेरी ब्लॉसम जगप्रसिद्ध आहे, तसाच फुलोरा लडाखच्या ॲप्रिकॉटच्या झाडांना येतो. सगळी व्हॅली फुलून जाते. सहा वर्षांपूर्वी ईशा टुर्सने ‘ॲप्रिकॉट ब्लॉसम’च्या सहली सुरू केल्या. त्या मोसमात खरंच स्वप्नातली दुनिया पाहाता येते.



आणि मग येतो तो लडाखच्या पर्यटनाचा मुख्य सीझन लडाखचा उन्हाळा. लडाखचा उन्हाळा असं म्हटलं तरी तिथे सुखद हवामान असतं. गेल्या वर्षी कोरोनामुळे लडाखमध्ये उन्हाळ्यात जाता आलं

नाही, पण या वर्षी मी गेलो. माझी ही लडाखची २१ वी सफर. तिला लागून लगेच आम्ही झंस्कार व्हॅलीच्या सहलीलाही गेलो.

वॉर्म-अप साठी हे दहा भाग लिहिले... धन्यवाद.

(समाप्त)

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/